SPORTS

- ७ सुवर्णांपैकी ५ सुवर्णपदके एकट्या महिला ब्रिगेडची; नेमके काय बदलले?
- मसल पॉवरची जागा माईंड गेमने घेतली

commonwealth games GLASGOW 2026

...अन् सँटियागो ठरले 'मास्टरमाईंड'

पॅरिस ऑलिम्पिकमधील पदकशून्य मोहिमेनंतर ज्या भारतीय बॉक्सिंगला समीक्षकांनी 'डेड एंड'वर आणून सोडले होते, त्याच भारतीय बॉक्सिंगने ग्लास्गो राष्ट्रकुलमध्ये थेट सुवर्ण इतिहास लिहिला! भारताने मिळवलेल्या एकूण ७ सुवर्णपदकांपैकी ५ सुवर्णपदके एकट्या महिला ब्रिगेडने लुटली. हा अचानक झालेला चमत्कार नव्हे तर भारतीय बॉक्सर्सच्या ताकदीला युरोपीय चातुर्याची जोड दिल्याचा तो परिणाम होता आणि ही जोड देणारे प्रशिक्षक होते सँटियागो निव्हा!

सँटियागो यांचा पहिला प्रहार रॉ ॲग्रेशनवर!

सँटियागो निव्हा यांनी भारतीय बॉक्सिंगमधील सर्वात जुना आणि घातक आजार ओळखून त्यावर थेट प्रहार केला, तो म्हणजे केवळ 'रॉ अग्रेशन' (अंदाधुंद आक्रमकता). भारतीय बॉक्सर रिंगमध्ये उतरताच फक्त पंच मारण्याच्या नादात स्वतःची दमछाक करायचे. निव्हा यांनी हा डीएनए बदलून 'डिस्टन्स मॅनेजमेंट' (अंतर नियंत्रण) आणि 'डिफेन्स फर्स्ट' (भक्कम बचाव) हा युरोपीय पॅटर्न आणला. 'शत्रूला थकू द्या, रिंगमध्ये फिरवा आणि तो चुकला की, त्याचा जबडा तोडणारा काऊंटर-पंच मारा,' हा निव्हांचा मूलमंत्र ग्लास्गोमध्ये गेमचेंजर ठरला.

मास्टरप्लॅनला साथ कुट्टप्पा यांच्या शिस्तीची!

या मास्टर प्लॅनला पुरुषांचे मुख्य प्रशिक्षक आणि द्रोणाचार्य पुरस्कार विजेते सी. ए. कुट्टप्पा यांच्या कडक शिस्तीची भक्कम साथ मिळाली. या जोडीने निवड प्रक्रियेत 'ओपन ट्रायल्स'चा कडक नियम लागू केला. नावावर किंवा जुन्या वशिल्यावर विसंबून न राहता, जो रिंगमध्ये जिंकेल तोच देशासाठी खेळेल, हा नियम आल्यामुळे प्रस्थापित खेळाडूंची मक्तेदारी संपली.

'मजबूत टॅलेंट पाईपलाईन' हा प्राधान्यक्रम

या नव्या सिस्टीमने भारताकडे एकाच वजनी गटात २ ते ३ आंतरराष्ट्रीय दर्जाचे बॉक्सर तयार केले आहेत, ज्याला तांत्रिक भाषेत 'मजबूत टॅलेंट पाईपलाईन' म्हणतात. तरुण खेळाडूंना वरिष्ठ संघात थेट संधी देऊन त्यांना परदेशी दौऱ्यांवर पाठवले गेले. हा टर्निंग पॉईंट ठरला.

खरे आव्हान मात्र यापुढे सुरू!

सँटियागो निव्हा आणि कुट्टप्पा यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय संघ नक्कीच योग्य दिशेने जात आहे; पण आता राष्ट्रकुलचे मैदान भारताने मारले असले, तरी उझबेकिस्तान, कझाकिस्तान, क्युबा, चीन आणि जपान यांसारख्या ऑलिम्पिकमधील खऱ्या 'महासत्ता' या स्पर्धेत नव्हत्या. त्यामुळे राष्ट्रकुलच्या सुवर्णाला खऱ्या अर्थाने झळाळी तेव्हाच येईल, जेव्हा हीच रणनीती २०२८ च्या लॉस एंजेलिस ऑलिम्पिकमध्ये भारताला सुवर्णपदक मिळवून देईल.

अजित आगरकर यांचे पद धोक्यात?

सेंटर ऑफ एक्सलन्सचे प्रमुख व्ही.व्ही.एस.लक्ष्मण रेसमध्ये पुढे

रोहितच्या निवृत्तीची चर्चा लीक झाल्याने 'बीसीसीआय' नाराज | **विश्वचषकापर्यंत आणखी मुदतवाढीची शक्यता संपुष्टात?** | **सप्टेंबरमध्ये होणार फैसला**

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

नुकत्याच झालेल्या इंग्लंड दौऱ्यादरम्यान कर्णधार रोहित शर्माच्या निवृत्तीबाबत आणि त्याच्या वन-डे भविष्याबाबत निवड समितीमध्ये झालेली गुप्त चर्चा माध्यमांमध्ये लीक झाल्यानंतर 'बीसीसीआय'चे वरिष्ठ पदाधिकारी संतप्त झाले असून, याचे पडसाद नजीकच्या काळात उमटण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, निवड समिती अध्यक्ष अजित आगरकर यांचे पद यामुळे अडचणीत आले आहे.

आगरकर यांचा मुख्य प्रशिक्षकपदाचा कार्यकाळ जून २०२६ मध्ये संपणार असताना 'बीसीसीआय'ने त्यांना ३ महिन्यांची तात्पुरती मुदतवाढ दिली होती. मात्र, इंग्लंडविरुद्धच्या पहिल्या दोन वन-डे सामन्यांतील सुमार कामगिरीनंतर, निवड समितीने रोहित शर्माला 'आम्ही आता पुढे चाललो आहोत आणि पुढील पिढीचा विचार करत आहोत' असा स्पष्ट संदेश दिला होता आणि त्याच्या भविष्याचा निर्णय त्याच्यावरच सोडला होता. यावरून वाद निर्माण झाला. त्यानंतर रोहित शर्माने थेट लॉर्ड्स् मैदानावर १३८ धावांचे झंझावाती शतक झळकात या टीकेचा जोरदार समाचार घेतला आणि खऱ्या वादाला सुरुवात झाली. रोहितच्या या शानदार पुनरागमनानंतर 'बीसीसीआय'चे सचिव आणि सर्वोच्च अधिकाऱ्यांनी उघडपणे रोहितला पाठिंबा दिला, यामुळे रोहितला संघातून बाहेर ठेवू पाहणारी निवड समिती पूर्णपणे बॅकफूटवर आली.

व्ही.व्ही.एस. लक्ष्मण यांचा गांभीर्याने विचार

अजित आगरकर यांच्या जागी 'बीसीसीआय' आता सेंटर ऑफ एक्सलन्सचे प्रमुख आणि भारताचे महान फलंदाज व्ही. व्ही. एस. लक्ष्मण यांना मुख्य निवडकर्ता बनवण्याच्या विचारात आहे. 'बीसीसीआय'च्या पदाधिकाऱ्यांचे असे मत आहे की, लक्ष्मण यांच्यासारख्या दिग्गज व्यक्तीचे मत विराट कोहली आणि रोहित शर्मासारखे वरिष्ठ खेळाडूदेखील कधीच टाळणार नाहीत, यामुळे संघात आणि निवड समितीत कोणताही वाद निर्माण होणार नाही.

सप्टेंबरच्या 'एजीएम' बैठकीत अंतिम निर्णय?

निवड समितीच्या अंतर्गत चर्चा मीडियात लीक होणे आणि रोहित शर्मासारख्या दिग्गज खेळाडूच्या निवृत्तीबाबत विनाकारण वाद निर्माण करणे आगरकर यांना महाग पडताना दिसत आहे. सप्टेंबर २०२६ मध्ये 'बीसीसीआय'ची वार्षिक सर्वसाधारण बैठक होणार आहे, यामध्ये आगरकर यांच्या कराराविषयी निर्णय होणे अपेक्षित आहे.

बीसीसीआयची आढावा बैठक लांबणीवर

अलीकडेच संपन्न झालेल्या इंग्लंड व आयर्लंड दौऱ्यातील भारताच्या अपयशी कामगिरीबद्दल बीसीसीआय आढावा बैठक घेणे अपेक्षित होते. मात्र, सचिव देवजीत सैकिया आजारी असल्याने ही बैठक लांबणीवर टाकण्यात आली आहे.

गुजरातच्या मुख्यमंत्र्यांकडे राष्ट्रकुल ध्वज सुपूर्द

गांधीनगर : वृत्तसंस्था

ग्लास्गो येथे संपन्न झालेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांचा अधिकृत ध्वज बुधवारी गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्याकडे एका विशेष सोहळ्यात दिमाखात सुपूर्द करण्यात आला. आगामी राष्ट्रकुल महाकुंभासाठी अहमदाबाद सज्ज होत असून, या ध्वजप्रदानामुळे राज्यातील क्रीडा पायाभूत सुविधांच्या आणि नियोजनाच्या भव्य तयारीला आता अधिकृतपणे सुरुवात झाली आहे. ग्लास्गो येथील स्पर्धांच्या शानदार सांगता समारंभात हा ऐतिहासिक राष्ट्रकुल ध्वज औपचारिकपणे भारताकडे सोपवण्यात आला होता. या जागतिक सोहळ्याला नीरज चोप्रा, भारतीय ऑलिम्पिक असोसिएशनच्या अध्यक्षा पी. टी. उषा आणि गुजरातचे उपमुख्यमंत्री हर्ष संघवी प्रामुख्याने उपस्थित होते. ग्लास्गो येथून हा ध्वज

भारतात आणल्यानंतर, गांधीनगर येथे आयोजित राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत उपमुख्यमंत्री हर्ष संघवी यांनी पूर्ण मान-सन्मानासह तो मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्याकडे सुपूर्द केला. या ऐतिहासिक आणि अभिमानास्पद प्रसंगी गुजरातचे नाव जागतिक पातळीवर उंचावणारे पॅरा-ॲथलिटस् राकेश भट्ट, रोहित माजगुल प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच, आंतरराष्ट्रीय पॅरा टेबल टेनिसपटू सोनल पटेल हिनेही या विशेष सोहळ्याला हजेरी लावली होती.

दुसऱ्या कसोटीवर पाकिस्तानची मजबूत पकड

पोर्ट ऑफ स्पेन : पाकिस्तानने वेस्ट इंडिजविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यावर आपले वर्चस्व पूर्णपणे प्रस्थापित केले. वेस्ट इंडिजचा दुसरा डाव अवघ्या ११७ धावांवर गुंडाळण्यात पाकिस्तानच्या गोलंदाजांना यश आले असून, शेवटचे वृत्त हाती आले, त्यावेळी विजयासाठी पाकिस्तानला केवळ ७५ धावांची आवश्यकता होती. वेस्ट इंडिजने पहिल्या डावात ३४४ धावा केल्यानंतर प्रत्युत्तरादाखल पाकिस्तानने ३८७ धावा फटकावून ४३ धावांची महत्त्वपूर्ण आघाडी घेतली. यानंतर वेस्ट इंडिजचा दुसरा डाव ११७ धावांवर संपला आणि यासह पाकसमोर ७५ धावांचे लक्ष्य होते.

५ दशकांची पदकाची प्रतीक्षा यंदा संपणार का?

भारतीय हॉकी संघाचे 'सुवर्ण' जिंकण्याचे लक्ष्य

- बेल्जियम-नेदरलँडमध्ये रंगणार यंदाचा वर्ल्डकप

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

बेल्जियम आणि नेदरलँड यांच्या संयुक्त विद्यमाने १५ ऑगस्टपासून सुरू होणाऱ्या १६ व्या हॉकी विश्वचषकात भारतीय पुरुष संघ तब्बल ५० वर्षांपासून सुरू असलेला विजेतेपदाचा दुष्काळ संपवण्याच्या निर्धाराने मैदानात उतरणार आहे. दुसरीकडे, भारतीय महिला संघ प्रथमच विश्वविजेतेपद पटकावण्याचे लक्ष्य घेऊन स्पर्धेत सहभागी होणार आहे.

भारतीय पुरुष संघाने १९७५ मध्ये विश्वचषक जिंकला होता. त्यानंतर पाच दशकांपासून भारताला विजेतेपद मिळालेले नाही. महिलांच्या गटात मात्र भारताला अद्याप विश्वचषक जिंकता आलेला नाही.

FIH HOCKEY WORLD CUP BELGIUM & NETHERLANDS 2026

यंदाच्या स्पर्धेत प्रथमच नवे स्पर्धा स्वरूप लागू करण्यात आले आहे. १६ संघांचे प्रत्येकी चार संघांचे चार गट करण्यात आले असून, प्रत्येक संघ साखळी फेरीत तीन सामने खेळेल. त्यानंतर संघांना दुसऱ्या गटातील संघांविरुद्धही सामने खेळावे लागतील. या फेरीनंतर गुणतालिकेच्या आधारे उपांत्य फेरीसाठी संघ निश्चित होतील. त्यामुळे प्रत्येक सामना अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

भारतीय संघांचे सामने

पुरुष	१५ ऑगस्ट	भारत विरुद्ध वेल्स	(सायं. ४.३० वा.)
	१७ ऑगस्ट	भारत विरुद्ध इंग्लंड	(सायं. ६.३० वा.)
	१९ ऑगस्ट	भारत विरुद्ध पाकिस्तान	(सायं. ६.३० वा.)
महिला	१६ ऑगस्ट	भारत विरुद्ध चीन	(सायं. ४.३० वा.)
	१८ ऑगस्ट	भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका	(सायं. ६.३० वा.)
	२० ऑगस्ट	भारत विरुद्ध इंग्लंड	(सायं.६.३० वा.)

अलीकडील कामगिरी काय सांगते?

भारतीय पुरुष संघाने मागील तीन विश्वचषकांमध्ये नववे, सहावे आणि नववे स्थान मिळवले होते. महिला संघाने २०२२ मध्ये नववे, २०१८ मध्ये आठवे स्थान पटकावले, तर २०१४ मध्ये स्पर्धेसाठी पात्र ठरता आले नव्हते. यंदाच्या स्पर्धेत दोन्ही गटांत भारतीय संघांकडून अधिक प्रभावी कामगिरीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

यंदाचा विश्वचषक हा स्पर्धेचा १६ वा हंगाम आहे. पहिला विश्वचषक १९७१ मध्ये खेळविण्यात आला होता. पुरुष विभागात पाकिस्तानने सर्वाधिक चार वेळा विजेतेपद पटकावले आहे, तर महिलांमध्ये नेदरलँडने तब्बल नऊ वेळा विश्वविजेतेपद जिंकत वर्चस्व राखले आहे.

डॉ. डी. वाय. पाटील अनंतात विलीन

कसबा बावडा पॅव्हेलियन मैदानावर शासकीय इतमामात : शोकाकुल जनसागराच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

आयुष्यभर शिक्षणाचा दीप प्रज्वलित ठेवत लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्यात आशेचा प्रकाश निर्माण करणारे, हजारो कुटुंबांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देणारे आणि समाजसेवेलाच आयुष्याचे ध्येय मानलेले शिक्षणमहर्षी डॉ. डी. वाय. पाटील (दादा) अनंतकाळाच्या प्रवासाला निघून गेले. बुधवारी (दि. ५) सायंकाळी ६.१० वाजता कसबा बावडा येथील पॅव्हेलियन मैदानावर शोकाकुल वातावरणात हजारो नागरिकांच्या साक्षीने त्यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले आणि 'ज्ञानसूर्य' अनंतात विलीन झाले. अखेरचा निरोप देताना संपूर्ण परिसर भावनांनी ओथंबून गेला. हजारो डोळ्यांतून वाहणारे अश्रू, हात जोडून उभे असलेले नागरिक आणि 'डी. वाय. दादा अमर रहे'च्या घोषणांनी भारावलेले वातावरण पाहून प्रत्येकाचे मन हेलावून गेले. पोलिस दलाच्या वतीने बंदुकीतून हवेत तीन फैरी झाडून मानवंदना देण्यात आली. गुरुवारी (दि. ६) सकाळी १० वाजता रक्षाविसर्जन होणार आहे.

बुधवारी दुपारी ४ वाजता अंत्ययात्रेला सुरुवात होताच कसबा बावड्यातील रस्ते जनसागराने भरून गेले. डी. वाय. दादांचे पार्थिव भारतीय तिरंगा ध्वजामध्ये लपेटले होते. रस्त्याच्या दोन्ही बाजूला उभे असलेले नागरिक हात जोडून दादांना अंतिम अभिवादन करत होते. अनेक महिलांना अश्रू अनावर झाले होते. अंत्ययात्रेवर ठिकठिकाणी पुष्पवृष्टी केली जात होती. सायंकाळी ५.१० वाजता पॅव्हेलियन मैदानावर अंत्यसंस्कारासाठी पार्थिव पोहोचताच शोकमग्न वातावरण आणखी गहिवरून गेले. पोलिस दलाच्या वतीने पार्थिव अंत्यसंस्कारासाठी चौथऱ्याजवळ नेण्यात आले. पोलिस दलाने पार्थिवावरील तिरंगा ध्वज काढून डी. वाय. दादा यांचे सुपुत्र डॉ. संजय डी. पाटील यांच्याकडे सुपूर्द केला.



कोल्हापूर : पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांना अखेरचा निरोप देण्यासाठी त्यांच्या अंत्ययात्रेला मोठी गर्दी झाली होती. फुलांनी सजवलेल्या ट्रकमधून त्यांचे पार्थिव कसबा बावडा येथील पॅव्हेलियन मैदानाकडे नेण्यात आले.

सायंकाळी ५.२९ वाजता डी. वाय. दादा यांचे पार्थिव अंत्यसंस्कारासाठी चौथऱ्यावर ठेवण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वतीने उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकात पाटील, जिल्हा प्रशासनाच्या वतीने पालकमंत्री प्रकाश आबिटकर, माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, दै. 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, दै. 'पुढारी' समूहाचे चेअरमन डॉ. योगेश जाधव, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, खासदार शाहू महाराज यांच्यासह मान्यवरांनी पुष्पचक्र अर्पण करून आदरांजली वाहिली.

डी. वाय. पाटील ग्रुपचे अध्यक्ष व डी. वाय. दादांचे सुपुत्र डॉ. संजय डी. पाटील यांच्या हस्ते धार्मिक विधी पार पडले. त्यानंतर सायंकाळी ५.४५ वाजता पोलिस दलाच्या वतीने शोक सलामी देण्यात आली.

पोलिस दलाच्या वतीने बंदुकीतून हवेत तीन फैरी झाडून मानवंदना देण्यात आली. सायंकाळी ६.१० वाजता डॉ. संजय डी. पाटील यांनी भडाग्नी दिला. हजारो नागरिकांच्या उपस्थितीत डी. वाय. दादांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. भडाग्नीनंतर उपस्थित अनेकांचा अश्रूंचा बांध फुटला. ज्यांनी आयुष्यभर इतरांचे जीवन उजळवले, त्या व्यक्तीला अग्नीच्या स्वाधीन होताना पाहणे अनेकांसाठी असह्य क्षण होता.

ज्ञानसूर्य अस्ताला गेला; पण विचार अमर राहतील

बुधवारी सायंकाळी सूर्य क्षितिजाकडे झुकत असतानाच कसबा बावड्यात शिक्षणाचा एक तेजस्वी सूर्य अस्ताला जात होता. अग्नीच्या ज्वालांमध्ये त्यांचे पार्थिव विलीन होत असताना उपस्थितांनी हात जोडून त्यांना अखेरचा निरोप दिला. 'डॉ. डी. वाय. पाटील अमर रहे' यासह इतर घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. त्या घोषणांमध्ये दुःख होते, अभिमान होता आणि त्यांच्या कार्याला सलाम करण्याची भावना होती.

अश्रूंचा महापूर

कसबा बावड्यात बुधवारी अश्रूंचा महापूर उसळला होता. मात्र त्या प्रत्येक अश्रूत डी. वाय. दादांबद्दलचा आदर, प्रेम आणि कृतज्ञता दडलेली होती. डी. वाय. दादांचे शरीर पंचतत्त्वात विलीन झाले असले, तरी शिक्षण, समाजसेवा आणि माणुसकीचा त्यांनी प्रज्वलित केलेला ज्ञानदीप कायम तेवत राहील. काळ पुढे सरकेल, पिढ्या बदलतील; पण लाखो विद्यार्थ्यांच्या यशात, हजारो कुटुंबांच्या आयुष्यात आणि समाजाच्या प्रत्येक प्रगतीत डॉ. डी. वाय. पाटील यांचे कार्य सदैव जिवंत राहील, या शब्दांत अनेकांनी भावना व्यक्त केल्या.

आयएमएचा आजपासून बंद

- होमिओपॅथी डॉक्टरांना एमएमसी नोंदणीला विरोध

चिपळूण : पुढारी वृत्तसेवा

सीसीएमपी हा वैद्यकीय अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना शासनाने एमएमसीमध्ये नोंदणी करून त्यांना प्रमाणपत्र दिले. ही बाब न्यायालयात प्रलंबीत असताना तसेच आयएमचा विरोध असतानाही शासनाने त्याची दखल घेतलेली नाही.

त्यामुळे सीसीएमपीधारकांची एमएमसीमध्ये नोंदणी बंद करण्याच्या मागणीसाठी राज्यात संप पुकारलेला असताना गुरूवारपासून नियमीत ओपीडीसह अतिदक्षता विभाग बंद ठेवण्यात येत असल्याचे इंडियन मेडिकल असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत सांगितले.

बंदबाबत माहिती देताना इंडियन मेडिकल असोसिएशनचे राज्य उपाध्यक्ष व चिपळूणचे अध्यक्ष डॉ. अब्बास जबले म्हणाले, बीएएमएस धारकांना आमचा विरोध नाही. शासकीय धोरणाला आमचा विरोध आहे. एमबीबीएसचा साडेचार वर्षाचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर ॲलोपॅथी उपचार पद्धतीस शासन मान्यता मिळते.

त्याउलट सीसीएमपी धारकांचा अभ्यास केवळ एक वर्षाचा तसेच आठवड्यातील दोन दिवस शिकवणारा अभ्यासक्रम आहे. त्यामुळे ॲलोपॅथी उपचारांसाठी त्यांना मर्यादा येत असल्याने ते रूग्णांच्या दृष्टीने त्रासदायक ठरू शकते. त्यासाठी इंडियन मेडिकल असोसिएशनने सुरूवातीपासूनच सीसीएमपीधारकांना महाराष्ट्र मेडिकल कौन्सीलमध्ये नोंदणी करण्यास विरोध केला आहे.

याबाबत आयएमए ने न्यायालयातदेखील दाद मागितली आहे, परंतु हा विषय न्यायप्रविष्ठ असतानाही राज्य सरकारने परस्पर सीसीएमपीधारकांना एमएमसीमध्ये नोंदणी करून एकाला प्रमाणपत्रदेखील दिले आहे.

आयएमएने मंगळवारपासून संप पुकारला आहे. त्याची दखल शासनाने घेतलेली नाही. त्यामुळे गुरूवारपासून संपूर्ण राज्यभरात आयएमएचे डॉक्टर गुरूवारपासून बेमुदत बंद पाळणार आहेत.

यामध्ये जिल्हाभरातील सुमारे ६०० डॉक्टर सहभागी होणार असून नियमित ओपीडीसह अतिदक्षता विभागदेखील बंद ठेवला जाणार आहे. शासनाने याची दखल घेऊन तत्काळ एमएमसीमध्ये सीसीएमपी धारकांची नोंदणी बंद करावी. त्यांना प्रमाणपत्र देऊ नये, अशी मागणी केली.

यावेळी सचिव डॉ. गणेश जोशी, डॉ. आशीर्वाद थत्ते, डॉ. ग. ल. जोशी, डॉ. विकास नातू, उपाध्यक्ष डॉ. मुश्ताक मुकादम, डॉ. वनिता सानप, डॉ. मनीषा वाघमारे, डॉ. अनुपमा जोशी उपस्थित होत्या.



चिपळूण : इंडियन मेडिकल असोसिएशनने उद्यापासून राज्यभरात अत्यावश्यक वैद्यकीय सेवा बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. यासंदर्भात पत्रक सादर करताना आयएमएचे राज्य उपाध्यक्ष डॉ. अब्बास जबले, डॉ. आशीर्वाद थत्ते, डॉ. विकास नातू, डॉ. मुश्ताक मुकादम, डॉ. गणेश जोशी, डॉ. मनीषा वाघमारे, डॉ. अनुपमा जोशी आदी.

पंजाब नैशनल बैंक punjab national bank

एआरएमबी, मुंबई शहर

६ वा मजला, युनायटेड बँक ऑफ इंडिया टॉवर, सर पी. एम. रोड, फोर्ट, मुंबई-४०० ००१ ईमेल : cs6041@pnb.bank.in

स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी विक्री सूचना

सरफेसी कायदा २००२ च्या नियम ८ (६) च्या सुरक्षेच्या हिताच्या (अंमलबजावणी) नियमांनुसार जंगम मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना.

सर्वसामान्य जनतेला आणि विशेषतः कर्जदार (हे) आणि हमीदार (दार) यांना याद्वारे सूचना देण्यात येते की, खाली वर्णन केलेली जंगम मालमत्ता सुरक्षित धनकोकडे गहाण/प्रभारीत आहे, ज्याचा सांकेतिक/प्रत्यक्ष ताबा बँकेच्या/सुरक्षित धनकोच्या अधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, तिची विक्री जसे आहे जिथे आहे, जसे आहे ते काय आहे आणि जे काही तिथे आहे या तत्त्वावर बँकेच्या/सुरक्षित धनकोच्या थकबाकीच्या वसुलीसाठी कर्जदार आणि हमीदार यांच्याकडून केली जाईल. राखीव किंमत आणि इसारा अनामत रक्कम खालील तक्त्यामध्ये दिलेल्या संबंधित मालमत्तेसमोर नमूद केल्यानुसार असेल.

सुरक्षित मालमत्तेची अनुसूची

कर्जदाराचे नाव (पेढी / कंपनी) सह-कर्जदार / प्रोप्रायटर / भागीदार / संचालक / हमीदार / गहाणदार	गहाण ठेवलेल्या स्थावर मालमत्तेचा तपशील / मालकाचे नाव (मालमत्तेचे गहाणदार)	अ) मागणी सूचनेची तारीख (कलम १३(२) नुसार) ब) थकबाकी रक्कम (१३(२) नुसार) + व्याज आणि इतर क) ताबा मिळाल्याची तारीख (कलम १३(४) नुसार) सरफेसी कायदा २००२ ड) ताब्याचे स्वरूप (सांकेतिक/प्रत्यक्ष/रचनात्मक)	अ) राखीव किंमत ब) बयाना रक्कम आणि जमा करण्याची अंतिम तारीख. क) बोली वाढीव रक्कम.	ई-लिलावाची तारीख /	सुरक्षित धनकोस माहीत असलेले बोजांचे तपशील.	मालमत्ता आयडी QR (कोड)
एआरएमबी, मुंबई शहर श्री. सुभाष रामचंद्र फणसमकर	सर्व्हे नं. ३०१, गट नं. १९२५-ए/२ (जुना सर्व्हे नं. १९२५), बंगला नं. १९, शांतीनगर, मौजे-लांजा, तालु-लांजा, जि.-रत्नागिरी ४१६७१२	अ) १५.०९.२०२५ ब) खर्च- रु. ८३,३७,९७५.७० (३१.०३.२०१८ पर्यंत) + पुढील व्याज आणि इतर खर्च क) १६.१२.२०२५ ड) सांकेतिक	अ) रु. ९२,८९,०००/- ब) रु. ९,२८,९००/- २४.०८.२०२६ (सकाळी ११.०० वाजेपर्यंत) क) रु. २५,०००/-	वेळ- २४/०८/२०२६ सकाळी ११.०० ते दुपारी ४.००	माहीत नाही	

ई-लिलाव विक्रीच्या अटी आणि शर्ती

१. विक्री ही सुरक्षा हित (अंमलबजावणी) नियम २००२ मध्ये विहित केलेल्या अटी व शर्तींच्या आणि खालील पुढील अटींच्या अधीन असेल:
२. मालमत्ता जसे आहे जिथे आहे, जसे आहे ते काय आहे आणि जे काही तिथे आहे या तत्त्वावर विकली जात आहे.
३. वर नमूद केलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या सुरक्षित मालमत्तेचा तपशील अधिकृत अधिकाऱ्याच्या सर्वोत्तम माहितीनुसार सांगण्यात आला आहे, परंतु या जाहीरनाम्यातील कोणत्याही त्रुटी, चुकीच्या विधानासाठी किंवा वगळण्यासाठी अधिकृत अधिकारी जबाबदार असणार नाहीत.
४. ही विक्री वर दर्शविल्याप्रमाणे : https://baanknet.com या वेबसाईटवर उपलब्ध असलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे स्वाक्षरीकर्त्याद्वारे केली जाईल.
५. विक्रीच्या तपशीलवार अटी व शर्तींसाठी कृपया www.baanknet.com, www.pnbindia.in चा संदर्भ घ्या.
६. संपर्क व्यक्ती : श्री. सुशील कुमार - मोबा. ८४२०१९४६७४, श्री. पवन गुडाधे - मोबा. ९४२३७४३११०, श्री. काशिफ झुबेर मोबा. ८४२५९८१७३३, श्री. रिजवान अली - मोबा. ७७६८९४१२५६
७. वरील कोणत्याही मालमत्तेसाठी बोली लावणारा कोणताही बोलीदार राखीव किंमतीपेक्षा जास्त आणि वर किमान वाढीव रक्कम जोडून बोली लावेल.

टीप: केंद्र सरकार/राज्य सरकार/कोणत्याही वैधानिक संस्थेची कोणतीही पुढील वैधानिक थकबाकी मालमत्ता खरेदीदाराद्वारे भरली जाईल. बँक कोणत्याही प्रकारची जुनी/भविष्यातील थकबाकी सहन करणार नाही.

सरफेसी कायदा, २००२ च्या नियम ८(६) अंतर्गत १५ दिवसांची वैधानिक विक्री सूचना

दिनांक: ०६.०८.२०२६
स्थान: मुंबई

स्वाक्षरी/-
अधिकृत अधिकारी, पंजाब नॅशनल बँक

सेकंडरी स्कूल्स् एम्प्लॉईज को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि. मुंबई

१०१, मानवदृष्टी, पहिला मजला, कुर्ला कोर्टाच्या समोर, एल.बी.एस. मार्ग, कुर्ला (पश्चिम), मुंबई- ४०००७०

(नोंदणी क्रमांक: बी.ओ.एम/आर.एस.आर/७२५/सन१९७५)

५१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

सेकंडरी स्कूल्स् एम्प्लॉईज को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि., मुंबई या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थेचे माननीय अध्यक्ष **श्री. पाटील चंद्रकांत बाजीराव** यांच्या अध्यक्षतेखाली पुढील कामकाजासाठी **रविवार दिनांक २३/०८/२०२६** रोजी सकाळी ठिक **०९.३० वा. राष्ट्रीय मिल मजदूर संघ मुंबई, मजदूर मंझील, ग. द. आंबेकर मार्ग, परेल, मुंबई - ४०००१२.** येथील सभागृहात बोलविण्यात येत आहे. तरी सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे, हि विनंती.

सभेपुढील विषय

१. दि. १७/०८/२०२५ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण व दि. ०१/०३/२०२६ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त कायम करणे.
२. दि. ३१ मार्च २०२६ अखेरचा संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रक तपासणी अहवाल वाचून संचालक मंडळाच्या अहवाल साली झालेल्या सभा संमत करणे.
३. संचालक मंडळाने शिफारस केल्याप्रमाणे नफा वाटणीस मंजूरी देणे व लाभांश जाहीर करणे.
४. सन २०२५-२०२६ सालचा वैधानिक लेखापरिक्षण तपासणी अहवाल वाचून त्याची नोंद घेणे,
५. सन २०२५-२०२६ सालाकरीता अंतर्गत व वैधानिक लेखापरिक्षकाची नेमणूक करणे.
६. मागील वर्षाच्या अंदाजपत्रकापेक्षा जास्त झालेल्या खर्चास व सन २०२६-२०२७ सालच्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
७. वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
८. मागील वर्षाच्या दोष दुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
९. सहकार खात्याने तयार केलेला नवीन आदर्श उपविधी दुरूस्तीसह स्वीकारणे बाबत.
१०. नफा विभागणीमधून वर्ग करावयाचा राखीव निधी नफ्याच्या २५% टक्के ऐवजी १०% प्रमाणे करणेबाबत.
११. संस्थेच्या अहवालसाली खरेदी केलेल्या जागा व खरेदी करावयाच्या जागांबाबत.
१२. संस्थेच्या मालकीची कार्यालये दुरुस्ती / नुतनीकरणा बाबत.
१३. सभासद शाळांसाठी सहकारी महाराष्ट्र मासीक सुरू करणेबाबत.
१४. मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करणे.

दिनांक : २७/०७/२०२६
स्थळ : मुंबई

आपला नम्र
किशोर मुरलीधर पाटील
(मानद् सचिव)
सेकंडरी स्कूल्स् एम्प्लॉईज को-ऑप. क्रे. सो. लि. मुंबई

विशेष सूचना

१. गणसंख्ये अभावी सभा तहकूब झाल्यास वरील सभा त्याच ठिकाणी वरील कामाचा विचार करण्यासाठी अर्ध्या तासाने सुरु करण्यात येईल. सदर सभेला गणसंख्येचे बंधन राहणार नाही.
२. संस्थेच्या कोणत्याही सभासदास काही प्रश्न विचारावयाचे असतील तर त्यांनी अशा सूचना संस्थेच्या कार्यालयामध्ये कार्यालयीन वेळेत दि. १९/०८/२०२६ पर्यंत लेखी द्याव्यात. ऐनवेळी येणाऱ्या प्रश्नांची उत्तरे देणे बंधनकारक राहणार नाही.
३. सभासदांसाठी संस्थेच्या ५१ व्या वार्षिक अहवालाची प्रत संस्थेच्या सर्व शाखांमध्ये उपलब्ध आहे तसेच संस्थेचे नफा तोटा पत्रक, ताळेबंद पत्रक, सभेची नोटीस व अहवाल याची पीडीएफ पाहण्यासाठी www.secondarysociety.com (https://